राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना विविध प्रकल्पा संदर्भात काम करणा-या विविध सल्लागार व इतर संस्थांना सहकारी साखर कारखान्याच्या प्रकल्पाचे मुल्यांकन करण्यासाठी मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांक ससाका १००४/प्र.क्र.८६/३-स
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १० ऑगस्ट, २००४

वाचा :- १) शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक ससाका ३९९५/सीआर-६३/ ३-सी, दिनांक १ फेब्रुवारी, १९९६
२) शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक ससाका ४९९७/१४३३८/ प्र.क्र.२५७/३-स, दिनांक २३ जानेवारी, १९९८
३) शुध्दिपत्रक , सहकार व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक ससाका ३९९९/प्र.क्र.२०६/ ३-सी, दिनांक ६ ऑक्टोबर, १९९९
४) शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक ससाका ३९९९/प्र.क्र. २०६/३-सी, १४ जानेवारी, २०००
५) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र. साआ/उपप/१३/प्र.स.सं./ २००४ , दिनांक १६ एप्रिल, २००४

**प्रस्तावना :-**

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांकडून अनेक प्रकारचे प्रकल्प राबविले जातात प्रामुख्याने नवीन कारखाना उभारणी प्रकल्प, अस्तित्वात असलेल्या कारखान्याचे उभारणी, आधुनिकिकरण सहवीज निर्मिती प्रकल्प, इथेनॉल, डिस्टीलरी पेपर, पार्टीकल बोर्ड इत्यादी प्रकल्प तयार करुन राबविण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांना अनेक प्रक्रियांमधून जावे लागते. त्यापैकी प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही एक महत्वाची प्रक्रिया आहे. प्रकल्पांची छाननी करताना ब-याच त्रुटी आढळून आलेल्या आहेत. त्यामुळे आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यास विलंब होतो व प्रकल्प तयार करणा-या संस्था कारखान्याकडून मोठया प्रमाणात प्रकल्प तयार करण्यासाठी फी वसूल करतात. हे टाळण्यासाठी प्रकल्प तयार करणे व राबविण्याचे टप्पे पाडून ते राबविल्यास कामांमध्ये सुसत्रता येऊ शकेल. यासाठी राज्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या विविध प्रकल्पासंदर्भात प्रकल्प अहवाल तयार करणा-या विविध सल्लागार व इतर संस्थानां मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त वाचा मधील अनु.क्र. १ ते ४ येथील शासन निर्णय या शासन निर्णयाव्दारे रद्द करण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहेत:-

अ) सहकारी साखर कारखान्यांची उभारणी होण्यापूर्वीची कामे व त्यासाठी लागणारा प्रकल्प अहवाल व उभारणी करीत असतांना व उभारणी पुर्ण झाल्यानंतर विविध बँकांकडे व वित्तिय संस्थाकडे करावी लागणारी कर्ज मागणी अहवाल साखर साखर कारखान्यांनी स्वत: किंवा कारखान्याचे आर्थिक सल्लागार यांचेकडून करुन घेण्यात यावा. साखर कारखान्यांनाआधुनिकीकरण, सहवीज निर्मिती इथेनॉल, प्रकल्प, डिस्टीलरी प्रकल्प, पेपर, पार्टीकल बोर्ड प्रकल्प अहवाल राज्यातील सहकारी साखर कारखान्यांचे

प्रकल्प अहवाल वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट, मांजरी, पुणे , नॅशनल शुगर फेडरेशन, नवी दिल्ली, मिटकॉन, पुणे, शुगर टेक्नॉलॉजी मिशन, नवी दिल्ली या संस्थांनी प्रकल्प अहवाल तयार करण्यास मान्यता देण्यात येत आहे. प्रकल्प अहवाल तयार करण्यात आकारण्यात येणारी फी समान राहील.

ब) प्रकल्पाची आर्थिक व तांत्रिक क्षमता तपासून अहवाल देण्याची जबाबदारी वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट,मांजरी,पुणे, नॅशनल फेडरेशन, नवी दिल्ली व मिटकॉन, पुणे यांची राहील. याबाबतची फी या संस्थानी समान आकारावी.

क) प्रकल्प राबविण्यासाठी तपासणी यंत्रणाकरीता प्रकल्प मंजूर झाल्यानंतर सुरु होईपर्यंत काम सुरळीत होण्यासाठी नॅशनल शुगर फेडरेशन, नवी दिल्ली व वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट, मांजरी, पुणे या संस्था इन्स्पेक्टिंग एजन्सी हणून राहतील. या संस्थापैकी एका संस्थेची सहकारी साखर कारखान्यांसाठी इन्स्पेक्टिंग एजन्सी म्हणून नेमणूक करण्यात यावी. याबाबतची फी या संस्थांनी समान आकारावी.

ड) प्रकल्प पूर्णत्वाचा दाखला देण्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकल्पाची उभारणी पूर्ण झाल्याबाबतचा दाखला देण्याची जबाबदारी त्या त्या प्रकल्पाच्या इन्स्पेक्टिंग एजन्सीची राहील. याबाबतची फी या संस्थांनी समान आकारावी.

३. यासंदर्भाने साखर आयुक्तालयास आवश्यक वाटल्यास नॅशनल प्रिमियर इन्स्टिटयूट कडून उदा. आयआयटी, नॅशनल केमिकल लॅब, नाबार्ड यांच्याकडून तपासणी अहवाल प्राप्त करुन घेण्याची मुभा राहील.

४. प्रकल्प अहवाल तयार करणे, क्षमतेनुसार प्रकल्प निश्चित करणे व प्रकल्प अहवालाची तांत्रिक व आर्थिक सक्षमता तपासण्यासाठी आकारावयाच्या फी बाबत साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे हे वेळोवेळी परिपत्रक काढून निश्चित करतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने.

( अ. म. तुप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रत,

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) सर्व प्रादेशिक सह संचालक (साखर)
४) महालेखापाल -१, मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
५) महालेखापाल -२, नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
६) महासंचालक,वसंतदादा साखर संशोधन, मांजरी, पुणे
७) मॅनेजिंग डायरेक्टर, एनसीडीसी, ४ सिरी इन्स्टिटयूशनल एरिया, नवी दिल्ली
८) जनरल मॅनेजर,महाराष्ट्र इंडस्ट्रियल अॅण्ड टेक्निकल कन्सल्टंसी ऑरगनायझेशन (मिटकॉन) लि., कुबेरा चेंबर्स, पुणे.
९) प्रादेशिक संचालक (पश्चिम), राष्ट्रीय सहकार विकास निगम, ५ बी.जे.रोड. , पुणे
१०) अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (म)., मुंबई
११) अध्यक्ष , महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ , नरिमन पॉईन्ट, मुंबई
१२) निवड नस्ती (३-स)